सिटी प्राईड ग्रुप ऑफ स्कूल

मराठी विभाग - २०२६

अभ्यासनाट्य कार्यशाळेचा अहवाल.

मराठी विभागातर्फे आयोजित अभ्यासनाट्य कार्यशाळा दिनांक **१ ऑगस्ट २०२६ रोजी शनिवारी सिटी प्राईड स्कूल निगडी** शाखेत पार पडली.

नाट्यसंस्कार कला अकादमी चे प्रमुख प्रकाश पारखी सर यांनी मार्गदर्शन केले.सकाळी ९ वाजता कार्यशाळेला सुरुवात झाली. ९ ते १२ अशी कार्यशाळेची वेळ ठरवण्यात आली होती.

सर्व प्रथम कार्यशाळेची प्रस्तावना सुषमा जोशी यांनी केली. श्री प्रकाश पारखी सरांच्या कार्याचा परिचय करून दिला. त्यानंतर पारखी सरांनी मार्गदर्शनास सुरुवात केली.

नाट्य शास्त्राची थोडक्यात माहिती,अभिनयाचे प्रकार,कथाकथन,एकपात्री प्रयोग,नाट्यछटा अशा गोष्टींवर मार्गदर्शन केले तसेच संगीतातील आरोह व अवरोह व व्यायाम यांची जोड रोजच्या व्यवहारात जर दिली तर आवाजाचा पोत सुधारतो हे सांगितले. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षकांकडून कृती करून घेऊन उत्तम मार्गदर्शन केले. संवादाशिवाय एक छोटे सादरीकरण तसेच संवादाचा योग्य वापर करून सादरीकरण करून घेतले. हे करताना निरीक्षण व परीक्षण करायला सांगितले. तसेच काही शिक्षिकांनी प्रश्न विचारले. तीन तास ही कार्यशाळा झाली.

यात सर्व शाखेच्या मराठी शिक्षिका व काही इतर विषयांच्या शिक्षिकांचा सहभाग होता.पारखी सरांकडून शाळेला 'प्रारंभिक नाट्यशास्त्र ' हे पुस्तक भेट स्वरूपात मिळाले आहे.

पारखी सरांचे तसेच उपस्थित सर्वांचे आभार रावेत शाखेतील विभाग प्रमुख अनुजा डांगे यांनी मानले.




नाट्य भ्यास करू ,व्यक्तिमत्व फुलवू!
अभ्यास नाट्य


अभ्यास